# जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com


संदर्भ -
1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र.जिवायो 1007/प्र.क्र.39/का1444, दि.16.02.2008
2. शासन निर्णय क्रं.मत्स्यवि- 2410/510/प्र.क्रं.104/10/पदुम-13, दि.19.09.2010
3. शासन निर्णय क्रं.मत्स्यवि- 2010/510/प्र.क्रं.247/10/पदुम-14, दि.28.09.2010
4. प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय औरंगाबाद यांचे तांत्रिक मान्यता आदेश क्रं.मत्स्य/तां.2/1561/2018, दि.08/09/2018
5. सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, परभणी यांचे पत्र क्र. सआमप/तां/725/2018, दि.31.10.2018

जा.क्र.जिनिस/जिवायो-18-19/ मत्स्यव्यवसाय/प्र.मा./नि.वि./.का.क्र.1/ 2120 दि.22नोव्हेंबर, 2018

## जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2018 -19 अंतर्गत प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2018-19 अंतर्गत मच्छीमार सहकारी संस्थांना सहाय्य व मच्छीमारी साधने या योजनांसाठी अनुक्रमे रु.2.30 लक्ष व रु.1.00 लक्ष असे एकुण रु.3.30 लक्षची तरतूद मंजूर असून अनुक्रमे रु.1.61 लक्ष व रु.0.70 लक्ष असा एकुण रु.2.31 लक्ष निधी या कार्यालयाचे BDS वर उपलब्ध झालेली आहे.

सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, परभणी यांनी संदर्भ क्र.5 अन्वये खालील परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे योजनानिहाय प्रशासकीय मान्यता व निधी मागणीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास अधिन राहुन व संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी जिल्हाधिकारी, परभणी या आदेशान्वये खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून खालील तपशिलाप्रमाणे रु.3.00 लक्षच्या रकमेस प्रशासकीय मान्यता देवून रु.2.31 लक्ष (अक्षरी रुपये दोन लक्ष एकतीस हजार फक्त) निधी वितरित करण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| अ क्र | योजनेचे नांव | मंजूर तरतूद | BDS वर उपलब्ध निधी | प्रशासकीय मान्यता किंमत | वितरित निधी | लेखाशिर्ष नियोजन विभाग - मागणी क्रमांक ओ - 50 (महसुली) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | **सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, परभणी** | | | | | |
| 1 | मच्छीमार सहकारी संस्थांना सहाय्य | 2.30 | 1.61 | 2.00 | **1.61** | 3451 - सचिवालयीन आर्थिक सेवा, (00), 101, नियोजन आयोग नियोजन मंडळ, (49) जिल्हा योजना-परभणी, (49) (03) इतर जिल्हा योजना (3451 2452) 31 - सहायक अनुदाने (वेतनेतर) |
| 2 | मच्छीमारी साधने | 1.00 | 0.70 | 1.00 | **0.70** | 2405 -मत्स्यव्यवसाय, 800, इतर खर्च (49) जिल्हा योजना - परभणी, (49)(01) मच्छीमारी साधने (2405 3181) 31 - सहायक अनुदाने (वेतनेतर) |
| **एकूण** | | **3.30** | **2.31** | **3.00** | **2.31** | |

**(अक्षरी रुपये दोन लक्ष एकतीस हजार फक्त)**

## अटी व शर्ती

1. सदर कामाची/योजनेची अंमलबजावणी आपल्या प्रशासकीय विभागाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचना/निकषानुसारच करण्यात यावी तसेच शासन स्तरावर मंजुर केलेल्या कामाची व्दिरुक्ती होणार नाही व सदरीचे काम अनुज्ञेय असल्याची खात्री करुनच सदर काम अनुज्ञेय असल्यासच कामास सुरुवात करावी.
2. या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेला निधी चालू आर्थिक वर्ष 2018-19 अखेरीस अखर्चित राहिल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिकाऱ्यांची राहील.
3. सदर योजनेसाठी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निधी प्रशासकीय मान्यता आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठीच खर्च करण्यात यावा इतर कोणत्याही योजनांवर / कामावर खर्च करण्यात येवू नये, तसेच पुर्व परवानगी शिवाय मंजूर काम/ योजनेच्या उदिष्टांच्या बाबीमध्ये कसलाही बदल करता येणार नाही.
4. सदर योजनेसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला/ येणाऱ्या निधी प्रशासकीय मान्यता आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठीच खर्च करण्यात यावा इतर कोणत्याही योजनावर / कामावर खर्च करण्यात येवू नये, तसेच पुर्व परवानगी शिवाय मंजूर काम/ योजनेच्या उदिष्टांच्या बाबीमध्ये कसलाही बदल करता येणार नाही.

5. सदर काम / योजनेकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेला/ येणाऱ्या निधी खर्च करण्यासाठी शासनाने/संबंधीत विभागाच्या मंत्रालयीन प्रशासकिय विभागाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचना / निकषानुसारच खर्च करावा.

6. या योजनेतंर्गतच्या कामांना आवश्यक असलेली तांत्रीक मंजूरी /प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेतच खर्च करावा.

7. उदयोग व ऊर्जा विभागाचा शासन निर्णय क्र.भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/ उदयोग-44, दि.30.10.2015 व दि.1.12.2016 अन्वये निविदा मागविणे, स्वीकृत करणे तसेच खरेदी बाबतचे अधिकार राहतील.

8. सहाय्यक अनुदानांची उपयोगीता प्रमाणपत्रे व पुर्णत्वाचे दाखले महालेखापाल कार्यालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास द्यावी. तसेच या योजनांवर झालेल्या खर्चाचे महालेखापाल यांचे कार्यालयात नोंद झालेल्या खर्चाशी ताळमेळ घालुन त्याची सुध्दा एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

9. सदरील योजनांचा त्रयस्थ/ खाजगी संस्थांकडून मुल्यमापन करण्यात येवू शकेल त्यामुळे या योजनेतंर्गत होणाऱ्या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा आणि दरमहा 5 तारखेपुर्वी या कार्यालयास प्रगती अहवाल सादर करावा.

10. या योजनेतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप लोकलेखा समिती, विधीमंडळ कामकाज इत्यादी बाबीसाठी संबधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.

11. या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीचा खर्च स्तंभ क्र.7 मध्ये दर्शविलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

प्रति,

सहाय्यक आयुक्त,
मत्स्यव्यवसाय, परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

1. महालेखापाल नागपूर - 2
2. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी

स्वा/-
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी